II आ नो भद्र: क्रतवो: यन्तु विश्वत: II

ADARSH VIDYA PRASARAK SANSTHA'S

ADARSH COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE

Near KBMC office, Kulgaon-Badlapur (E), Tal. Ambarnath Dist. Thane 421503

Permanently Affiliated to University of Mumbai & Recognized under 2(f) & 12B of UGC Act, 1956

**NAAC Re-Accredited (3rd Cycle) B++ Grade with CGPA 2.89 (2024-2029)**

IMC-RBNQA -2019, ISO 9001-2015 Certified

www.adarshcollege.avpskulgaon.net, adarshcollege@rediffmail.com, 0251-2691819, 9309081149


**महाराष्ट्र शासन आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा**

**वाचन पंधरवडा (दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५)**

निमित्त आयोजित

## वाचन कौशल्य कार्यशाळा

महाराष्ट्र शासनाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमांतर्गत दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या काळात वाचन पंधरवडा आयोजित केला आहे. सदर वाचन पंढरवड्याचे औचित्य साधून आदर्श महाविद्यालयात दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यार्थ्यांसाठी 'वाचन कौशल्य कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी जेष्ठ पत्रकार श्री. प्रशांत मोरे यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. श्री. प्रशांत मोरे यांनी विद्यार्थ्यांना पत्रकारिता क्षेत्रातील आपले अनुभव कथन केले त्याचबरोबर पत्रकारिता करताना विविध ग्रंथ वाचनाचा कसा फायदा झाला ते स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी विविधांगी वाचन कसे करावे, वाचनासाठी पुस्तकांची निवड कशी करावी, व्यक्तिमत्त्व विकासासाठी पुस्तक उपयुक्त कशी ठरतात, वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाला दिशा कशी मिळते याबाबत श्री. प्रशांत मोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री. प्रशांत मोरे यांनी उत्तरे दिली.

प्रा. मंदार ठाकूर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली तसेच आभार प्रदर्शन केले. प्रा. लक्ष्मीकांत सातपुते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

ADARSH COLLEGE OF ARTS COMMERCE & SCIENCE Kulgaon Badlapur ESTD 1995

**प्रा. मंदार ठाकूर**

कार्यशाळा समन्वयक